
१) दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती....मराठी पत्रकार दिन कार्यक्रम)










समवेत फोटो आहे- फोटो ओळ- भोसला मिलिटरी कॉलेजच्या जर्नालिझम अँन्ड मास कम्युनिकेशन विभागातर्फे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी जेष्ठ अँकर व प्रोड्युसर(एबीपी माझा मुंबई) अमित भिडे शेंजारी जेष्ठ लेखक,वक्ते डॉ.उल्हास रत्नपारखी,प्राचार्य डॉ.दिनेश नाईक

फोटो दोन-भोसला मिलिटरी कॉलेजच्या जर्नालिझम अँन्ड मास कम्युनिकेशन विभागातर्फे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी जेष्ठ अँकर अमित भिडे यांचे स्वागत करतांना प्राचार्य डॉ.दिनेश नाईक, शेजारी जेष्ठ लेखक,वक्ते डॉ.उल्हास रत्नपारखी

--------------------------------------------------------------

अपार कष्टाच्या जोडीला आत्मविश्वास,संवादकौशल्याद्वारे मिडीयात करिअरची उत्तम संधी

अमित भिडेः भोसला मिलिटरी कॉलेजमध्ये बाळशास्त्री जांभेकर जयंतीनिमित्त साधला संवाद

नाशिक- वाढत्या स्पर्धेमुळे नवमाध्यमांसमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहे. पण काळानुरूप ज्ञान संपादन करून अपार कष्ट करण्याची तयारी, आत्मविश्वस व उत्तम संवाद कौशल्य असेल तर माध्यमांतील करिअरच्या संधी तुमची वाटच पहात आहे, असे प्रतिपादन, जेष्ठ अँकर,प्रोड्युसर अमित भिडे यांनी केले.

भोसला मिलिटरी कॉलेजच्या जर्नालिझम अँन्ड मास कम्युनिकेशन विभागातर्फे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आज श्री.भिडे यांचे व्याख्यान झाले. नव्या युगातील माध्यमांसमोरील आव्हाने आणि करिअरच्या संधी हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. जेष्ठ लेखक,वक्ते डॉ.उल्हास रत्नपारखी हे कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ.दिनेश नाईक हे व्यासपीठावर होते, तर राष्ट्रीय स्वयसेवक संघाचे प्रांत वैचारिक समूह प्रमुख(पश्चिम महाराष्ट्र) दिलीपराव क्षिरसागर, शहर प्रचार मंडळाचे सदस्य श्रीपाद व्यवहार,पंकज वाकदकर यांची विशेष उपस्थिती होती. सुरवातीला

श्री.भिडे,डॉ.रत्नपारखी यांच्याहस्ते जांभेकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलन करण्यात आले. नव्या युगातील आव्हाने स्पष्ट करतांना श्री.भिडे म्हणाले,पत्रकाराने स्वतःला नेहमी अपडेट

ठेवले पाहिजे,या जीवघेण्या स्पर्धेत सर्वप्रथम वृत्त देणे,त्यातील विश्वासार्हता,त्याला मिळणारा प्रतिसाद, हवा तो विषय(विमर्स) लोकांपर्यत पोहचून आपले ध्येय साध्य करणे,भूलथापाना बळी पडणे,पद पैशाचा वापर करून होणारी प्रसिध्दी यासारखी आव्हाने आहे,त्यात टिकून राहण्यासाठी वाचन,लिखानाची आव्रड,वेगळे काही करण्याचा ध्यास हवा तसेच उत्तम यश मिळू शकेल. वृत्त विश्लेषक,वृत्त निवेदक,संशोधक,विशेष प्रतिनिधी,लेखक,जनसंपर्क अधिकारी,जाहीरात व्यवस्थापक,संपादक,माध्यम संवादक,डिझायनर यासारख्या,सिनेमेट्रोग्राफर,कॅमेरामन,प्रेझेन्टर,प्रॉडक्शन स्पेशालिट या संधी आहेत.

जांभेकराचें कार्य अद्वितीय

बाळशास्त्री जांभेकरांचे कार्य विषद करतांना डॉ.रत्नपारखी म्हणाले,६ जानेवारी १८३२ ला मराठीतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरु करण्याचा मान त्यांना मिळाला. त्यासाठीच आद्य पत्रकार म्हणूनही त्याची वेगळी ओळख आहे. हा त्यांचा जन्मदिवस नव्हे हे आपण लक्षात घ्यावे.कोकणातील पोंभुर्ले गावी जन्मलेल्या जांभेकरांनी आपल्या वडीलांकडेच मराठी,संस्कृते धडे गिरवले,पुढे ते मुंबईत आले. त्यांनी इंग्रजी,संस्कृतबरोबरच गणित,शास्त्र सारख्या विषयांत प्राविण्य मिळवले. 'बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या विद्यालयात अभ्यास करून त्यांनी विशीच्या आत कोणत्याही भारतीयाने न मिळवलेले प्राध्यापक पदाचे ज्ञान प्राप्त केले. १८३४ साली त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये पहिले भारतीय व्याख्याते म्हणून नियुक्ती झाली. त्यांना मराठी,संस्कृत,बंगाली,गुजराती,कानडी,तेलगु,पारसी,फ्रेंच,लॅटिन व ग्रीक अशा दहा भाषांचे ज्ञान होते. यावेळी डॉ.रत्नपारखी सतीप्रथम,अत्याचार हे तत्कालीन वास्तव मांडले. दूरदृष्टी असणारे जांभेकर हे अद्वितीय व्यक्तीमत्व होते असे त्यांनी नमूद केले. प्राचार्य डॉ.नाईक यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. ऋतुजा आंदेवाड हिने परिचय करुन दिला. प्रा.सौ.स्नेहा कुलकर्णी यांनी सुत्रसंचालन केले.

------------------------------------------------------------------------------------------------------------------

२)रेडीओ विश्वास भेट

नाशिक– आपल्या महाविद्यालयातील जर्नालिझम अँन्ड मास कम्युनिकेशन (जेएमसी) विभागातील प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आज रेडिओ विश्वास ला भेट दिली. रेडीओ एक माध्यम,रेडिओचे प्रकार,कार्यपध्दती,माध्यम म्हणून श्रोतृवर्गाकडून मिळणारा प्रतिसाद,स्पर्धेच्या युगात शासनाचे मुक्त धोरण,एफएम सारख्या रेडिओला मिळणारा प्रतिसाद,विविध योजना यासारख्या पत्रकारीतेशी संबंधीत विविध बाबींवर केंद्र संचालक डॉ.हरिभाऊ कुलकर्णी,ऋचिता ठाकूर यांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कामात सहभागी होत,संहिता वाचन,आवाजातील चढउतार,रेकॉर्डिंग,व्हाईस ओव्हर,एडिटिंग यासारख्या बाबीं जाणून घेतल्या. तंत्रज्ञ सागर नागरे यांनी रेडिओ स्टुडिओतील तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती दिली. जर्नालिझम अँन्ड मास कम्युनिकेशन विभागाचे श्रीकृष्ण कुलकर्णी यांनी यांच्या मार्गदर्शनाखाली ही भेट आयोजित करण्यात आली होती. भोसला स्कूलचे कमांडट कर्नल संदीप पुरी,कर्नल मनदीप सिंग यांच्याहस्ते डॉ.हरीभाऊ कुलकर्णी यांचा विद्यार्थीनी लेखा जोसेफ हिच्या हस्ते ऋचिताचा तर रविंद्र गोडबोले यांच्या हस्ते सागर नागरे,ऋचिताचे स्वागत करण्यात आले. डॉ.योगेश कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले.






SERVER


STUDIO


FM Tranamitter, type CRS-60, mark Ⅱ
ALARMS
STATUS MONITOR
ATC Labs
Perceptual SoundMax
ANTENNA
TRANSMITTER-2





----------------------------------------------------------------------

------------------------------------------------------३) एबीपी माझा भेट




abp न्यूज़
abp माझा
GPS Map Camera
Google
Nashik, Maharashtra, India
Xqvf+rmf, Sharanpur Link Rd, Wild Orcade Society,
Canada Corner, Nashik, Maharashtra 422005, India
Lat 19.994765° Long 73.773692°
11/01/25 12:46 PM GMT +05:30







जर्नालिझम अँन्ड मास कम्युूनिकेशनच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आज शैक्षणिक भेटींतर्गत आज एबीपी माझ्याच्या ब्युरो कार्यालयाला भेट दिली. ब्युरो चिफ मित्रवर्य मुकूल कुलकर्णी यांनी सर्वांचे स्वागत करत त्या ठिकाणच्या कामकाजाची सविस्तर माहिती दिली. त्यात स्क्रीप्टिंग,एडिटिंग,ऑनएअर फंक्शन,स्टुडीओ लाइव्ह बुलेटिनमधील सहभाग,कॅमेऱ्यातील अचूकता यासारख्या बाबींचा समावेश होता. एबीपीच्या वेबपोर्टलची माहिती अनिरूध्द जोशी यांनी दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारत आपल्या शंकाचे निरसन करून घेतले. कर्नल संतोष पांडा,रोहित वर्मा, रविंद्र गोडबोले,ओंकार तपासे यांनी मयुरेश बारगजे,शुभम बोडके,किरण कट्यारे,अनिरूध्द जोशी यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. इलेक्ट्रॉनिक्स टिव्ही माध्यमातील कार्यप्रणालीचा एक वेगळा अनुभव यानिमित्ताने विद्यार्थ्यांना घेता आला

-----------------------------------------------------------------------------------

४) स्कूल ऑफ अर्टिलरी- एक्स तोपची २०२५ प्रात्याक्षिके भेट






5 MM
ULH
VAJRA


155 MM
ULH





भोसला मिलिटरी कॉलेजच्या जर्नालिझम अँन्ड मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी आज स्कूल ऑफ अर्टिलरीच्या एक्स तोपची २०२५ या (देवळाली कॅम्प तोपची रेंज) या कार्यक्रमात सहभाग नोंदवला, यावेळी बोफोर्स,धनुष्य यासारख्या आयुधांची याचि देही याचि डोळा चित्तथरारक प्रात्याक्षिके अनुभवली, दैनंदिन अभ्यासाच्या व्यस्ततेतून हा अनुभव काहीसा वेगळा होता. ही काही क्षणचित्रे

---

५) जिल्हा माहिती कार्यालय भेट











भोसला मिलिटरी कॉलेजच्या जर्नालिझम अँन्ड मास कम्युनिकेशन विभागाच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आज शैक्षणिक भेटींतर्गत नाशिक जिल्हा माहिती कार्यालयास भेट दिली. मित्रवर्य व सकाळ मधील सहकारी जिल्हा माहिती अधिकारी गोपाळ जी साळुंखे यांनी सर्वांचे स्वागत केले. जिल्हा माहिती कार्यालय हे प्रचार,प्रसिध्दीचे प्रमुख काम करत असून माध्यमे,पत्रकार आणि सरकार यांच्यामधील दुवा म्हणून कार्यालय परिचित असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी शासनाच्या पत्रकारांसाठीचे पुरस्कार,विविध योजना,मंत्र्याचे दौरे त्यावेळी होणारे वार्तांकन,पत्रकार परिषद,लोकराज्य मासिक यासारख्या विविध बाबींवर संवाद साधला. शिवाय आगामी सिंहस्थ कुंभमेळयाच्या दृष्टीने विभागाच्या कामकाजाची सविस्तर माहिती दिली. जिमाकातील सहकारी श्री.कराडे यांनी ऑनलाईन,डिजीटल मिडीयाविषयी माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना श्री.साळुंके व कराडे यांनी उत्तर देत शंकाचे निरसन केले.